International Journal of Classified Research Techniques & Advances (IJCRTA)
Multidisciplinary Peer-Reviewed Online Open Access Journal Impact Factor: 5.688
Volume 4, Issue 4, Oct-Dec 2024 ID: IJCRTA0000138 ISSN: 2583-1801
Email: ijcrta@gmail.com Website: www.ijcrta.org

# यशवंतराव चव्हाण यांच्या नेतृत्वाची जडणघडण

**नामदेव दिगांबर सुर्यवंशी* & प्रा. डॉ. पी. जी. जाधव****

**लेखक सलंग्नता:**
*पीएच.डी संशोधक विद्यार्थी, राज्यशास्त्र विभाग, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड. महाराष्ट्र.
**प्राध्यापक तथा राज्यशास्त्र विभाग प्रमुख, लाल बहादूर शास्त्री महाविद्यालय, धर्माबाद. नांदेड. महाराष्ट्र.

**लेख संदर्भ:** सूर्यवंशी ना. दि. & जाधव पी, जी. (2024). यशवंतराव चव्हाण यांच्या नेतृत्वाची जडणघडण. International Journal of Classified Research Techniques & Advances (IJCRTA) ISSN: 2583-1801, 4 (4), 1-5. ijcrta.org

**प्रस्तावना:**

एका सामान्य शेतकरी कुटुंबात जन्मलेल्या यशवंतराव चव्हाण यांनी आपल्या कर्तृत्वाच्या बळावर मुंबई विधिमंडळाचे पार्लमेंटरी सेक्रेटरी, नागरी पुरवठा मंत्री, द्विभाषिक राज्याचे मुख्यमंत्री, स्वतंत्र महाराष्ट्राचे मुख्यमंत्री, केंद्रात संरक्षणमंत्री, गृहमंत्री, अर्थमंत्री, परराष्ट्रमंत्री, विरोधी पक्ष नेता, उपपंतप्रधान आणि वित्त आयोगाचे अध्यक्ष अशी अनेक पदे यशवंतरावांनी भूषविली. प्रत्येक पदावरील निर्णयातून, भाषणातून आणि कृतीतून त्यांचा वैचारिक पिंड दिसून येतो. यशवंतरावांना कौटुंबिक वारसा, आर्थिक परिस्थिती किंवा राजकीय वारसा नसतानासुद्धा ते देशाच्या सर्वोच्च पदावर विराजमान झालेले कदाचीत एकमेव व्यक्तिमत्त्व असावेत. यशवंतराव चव्हाण यांनी महाराष्ट्र राज्याचे पहिले मुख्यमंत्री म्हणून महाराष्ट्राच्या विकासाला दिशा दिली, विधायक विचार मांडला. याचे मूळ यशवंतरावांच्या वैचारिक जडण-घडणीत आढळून येते. यशवंतरावांच्या जडण-घडणीत अनेक घटक कारणीभूत आहेत. यात स्वत: यशवंतराव म्हणतात की, "संस्कारक्षम मन असणे, ही देणगी नियतीची असते. विचार, कृती व सहचार्य यांचे मनावर परिणाम घडत असतात. संस्कारक्षम मन हे सर्व साठवित असते आणि त्यातून माणूस घडत असतो. "मी तरी घडलो" अशी कबुली यशवंतराव देतात. त्यांच्या मते संस्कार, विचार व सहचार्य याने व्यक्ती घडत असला तरी व्यक्तीला स्वतः विषयीचे ज्ञान पूर्णपणाने स्वत:लाच करुन घेता येते असे नव्हे. लोक काय म्हणतात, त्यावरुन पुष्कळ अंशाने स्वतः विषयीचे ज्ञान घडत राहते. म्हणून लोकमानसाच्या काचेत आपले प्रतिबिंब कसे दिसते, ते पाहण्यासाठी व्यक्ती इच्छा बाळगून असतो.

**मित्रांचा सहवास:**

यशवंतरावांच्या जडण-घडणीत त्यांच्या मित्रांचा वाटा फार मोठा आहे. शालेय जीवनापासून ते राजकारणात सत्ता स्थानावर असेपर्यंत यशवंतरावांना अनेक मित्र लाभले होते. विद्यार्थी दशेत असतांना स्वातंत्र्य आंदोलनाच्या काळात आणि राजकारणात अनेक मित्रांची सोबत यशवंतरावांना लाभली होती. स्वातंत्र्य आंदोलनापासून मुस्लीम व दलित समाज अलिप्त का आहे? याची कल्पना यशवंतरावांना त्यांचा मित्र अहमद कच्छी याने दिली होती. उथळे हा महार समाजातील मुलगा यशवंतरावांचा मित्र होता. महार समाजाची दुःखे सर्वांपेक्षा वेगळी आहेत, यांची कल्पना उथळे याने यशवंतरावांना दिली होती. यशवंतरावांची जडण-घडण होत असतांना भारतीय समाजव्यवस्थेतील विविध स्तरातील विचार प्रवाहांचे आकलन यशवंतरावांना आपल्या मित्राशी केलेल्या चर्चेतून होत होते. राष्ट्रीय आंदोनाच्या काळात व पुढे सत्तास्थानी गेल्यावर यशवंतरावांच्या जीवनात अनेक मित्र आले होते. गौरीहर सिहांसने, के.डी. पाटील, दयार्णव कोपर्डेकर, शांताराम इनामदार, हरिभाऊ लाड, राघूआण्णा लिमये, आत्माराम जाधव इ. अनेक मित्र त्यांना बालपणी लाभले होते. राजकारणात सत्तास्थानी आल्यावर यशवंतरावांना किसन वीर, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, वसंतराव पाटील, धुळाप्पा नवले, वसंतराव नाईक, भाई धनसिंग, एस. एम. जोशी, दता देशमुख, ह.रा. महाजनी इ. अनेक मित्र यशवंतरावांना होते. याशिवाय राजकारणाबाहेरील क्षेत्रात कार्य करणारेही अनेक मित्र त्यांना होते. यशवंतरावांनी आपल्या आत्मचरित्रात शालेय जीवनापासून ते राष्ट्रीय आंदोलनाच्या कालखंडामध्ये त्यांना लाभलेल्या मित्रांच्या सहवासाबाबत उल्लेख केलेला आहे. यशवंतराव म्हणतात "माणसाचे जीवन फुलवायचे असेल तर त्याला सोबतीची सांगड पाहिजे. माझ्या आयुष्यात जरी काही घडल्याचे दिसत असेल तर माझ्या सोबत्यांनी घडविले, असे माझे प्रांजळ मत आहे."

**तुरूंगवास:**

१९३२ मध्ये यशवंतराव कॅम्पजेलमध्ये होते. या तुरुंगातील १५ महिन्याच्या काळात यशवंतरावांनी खूप वाचन केले. येथील वाचनातून त्यांची भावनाशिलता कमी झाली व विचारांची खोली वाढविण्याची प्रक्रिया सुरु झाली. विद्यार्थी दशेत असतांना यशवंतरावांनी जेवढे वाचन केले होते, तेवढे या तुरुंगात असतांना केले. 'शाकुंतल, ज्युलीयस सीझर' ही नाटके, सावरकरांचे कमला व गोमंतक हे काव्य त्यांनी वाचले. सावरकरांच्या काव्यातील व देशप्रेमाची उत्कंटता यामुळे त्यांचे तरुण मन भारावून गेले.

**राष्ट्रीय नेतृत्वाचा प्रभाव:**

यशवंतराव चव्हाण हे चळवळीत काम करीत असताना त्यांचा अनेक क्रांतिकारक, राजकीय नेतृत्व, समाजसुधारक यांच्याशी संबंध आला या सर्वांचा त्यांच्यावर प्रभाव पडल आहे. प्रभाव पडलेल्या घटकांचा अभ्यास खालीलप्रमाणे-

**यतिंद्रनाथ दास यांच्या मृत्यूचा परिणाम:**

देशात घडणाऱ्या घटनाचे अर्थ समजावून घेण्याच्या मनःस्थितीपर्यंत ते पोहोचले. जातीय विचारांच्या संकुचित कोंडवाड्यातून बाहेर पडण्याचा त्यांचा विचार पक्का झाला. छोट्या-छोट्या जातीय किंवा धार्मिक प्रश्नाचे थोडे फार आकर्षण यशवंतरावांना बालवयात होते; परंतु या घटनेनंतर त्यांचे विचार हळूहळू स्पष्ट होत चालले होते. संकुचित वृत्तीने काम करण्यापेक्षा कुठल्यातरी व्यापक दृष्टीने काम केले पाहिजे, अशी त्यांच्या मनाची घडण होत होती. यतिंद्रनाथांच्या मृत्यूने त्यांचा दृढः निश्चय झाला आणि हा प्रश्न त्यांनी त्यांच्या पुरता सोडविला. कणाकणाने आणि क्षणाक्षणाने ज्यांच्यासाठी देहत्याग करावा, अशी ध्येय आणि कामे या देशात आहेत. यशवंतरावांना त्यांच्या आयुष्याचे सार समजले आणि सूर सापडला." यतिंद्रनाथांच्या मृत्यूमुळे यशवंतरावांच्या मनोवृत्तीत आमुलाग्र बदल झाला. देशात घडणाऱ्या घटनांचा अन्वयार्थ त्यांनी समजून घेण्याचा प्रयत्न केला. देशकार्यात भाग घेण्याची प्रेरणा यामुळे त्यांना प्राप्त झाली.

**लोकमान्य टिळकांचा प्रभाव:**

कराड येथे लोकमान्य टिळकांचे स्मारक म्हणून गावातील प्रमुखांनी इंग्रजी शाळा सुरु केली होती. यशवंतराव टिळक हायस्कूलचे विद्यार्थी होते. टिळक हायस्कूलमध्ये टिळकांचे विचार आणि आयुष्य या संबंधाने निबंध स्पर्धा व वर्तृत्व स्पर्धा दरवर्षी घेतल्या जात असत. यशवंतराव या स्पर्धेत भाग घेत. त्यांनी टिळकांवर लिहिलेल्या निबंधाला पहिले बक्षीस मिळाले होते. यशवंतरावांनी टिळकांचे चरित्र व त्यांच्या लेखांची पुस्तके वाचली होती. टिळकांच्या व्यक्तिमत्वाचा परिणाम त्यांच्या भावनांवर झाला होता. राष्ट्रीय स्वरुपाच्या प्रश्नांबाबत काही तरी केले पाहिजे, असा विचार त्यांच्या मनात आला. लोकमान्य टिळक हे इंग्रजाविरुध्द लढणारे सेनापती आहेत, अशी त्यांची भावना होती. टिळकांनी सांगितलेला स्वराज्याचा विचार त्यांना महत्वाचा वाटला. यशवंतरावांना टिळकांबद्दलचा आदरभाव आमरण राहिला. जातीपातीच्या प्रश्नापेक्षा देशाच्या प्रश्नाकडे ते वळले व आमरण ही व्यापक दृष्टी त्यांनी जोपासली. ही निवडलेली अखिल भारतीय दृष्टी हा चव्हाणांच्या जीवनाचा पुढील पाया ठरला. ह्यावरच पुढील भव्य इमारत उभी राहिली. यामुळे ते शेवटपर्यंत काँग्रेसवादी होते." टिळकांच्या प्रभावातून यशवंतराव राष्ट्रीय कामाकडे वळलेले आढळून येतात.

**महात्मा गांधीच्या नेतृत्वाचा प्रभाव:**

लोकमान्य टिळकांच्या मृत्यूनंतर राष्ट्रीय आंदोलनाचे नेतृत्व महात्मा गांधी यांच्याकडे आले. म. गांधीच्या नेतृत्वाखाली असहकार चळवळ, कायदेभंगाची चळवळ व भारत छोडो आंदोलने झाली. यशवंतरावांनी राष्ट्रीय आंदोलनात सहभाग घेतला होता. यशवंतरावांची गांधीजीच्या व्यक्तिमत्वावर निष्ठा होती. त्यांनी गांधीजीचे राजकीय नेतृत्व मान्य केले होते. गांधींच्या नेतृत्वाच्या प्रभावामुळे ते राष्ट्रीय चळवळीत सामील झाले; परंतु यशवंतराव गांधीवादी कधीच नव्हते. गांधींबद्दल त्यांच्या मनात श्रध्दा होती.

यशवंतरावांच्या नुसार "जे शिक्षण चारित्र्याची जडण-घडण करित नाही, ते पूर्णपणे कुचकामी शिक्षण होय. नीतिमत्तेपासून विलग होणारे किंवा तिला विरोधी असलेले अर्थशास्त्र हद्दपार केले जावे. शरीर मन व आत्मा यांच्यात जोपर्यंत सुसंवाद नाही, तो पर्यंत कोणतीही न्याय गोष्ट होणार नाही, असे गांधीजी म्हणत, त्याला अर्थ आहे. आपल्याला खरे जीवन जगायचे असेल तर आपण मानसिक निष्क्रियता टाकून दिली पाहिजे आणि मुलभूत विचार केला पाहिजे तरच आपले जीवन अतिशय साधे होईल, अशी महत्वाची सूत्रे यशवंतरावांनी गांधीजीकडून आत्मसात करण्याचा प्रयत्न केला. महात्मा गांधीनी साध्य साधन शुचितेचा जो विचार मांडला, त्याचाही प्रभाव

यशवंतरावांच्या विचारांवर पडलेला होता." अशाप्रकारे महात्मा गांधीच्या प्रभावातून यशवंतरावांनी राष्ट्रीय चळवळीत भाग घेतला होता. साधन शुचिता, राजकीय सद्गुण या बाबी स्वीकारल्या, सामाजिक स्वास्थ्य आणि सामाजिक विषमतेचे प्रश्न या बाबी यशवंतरावांनी आपल्या आचरणात आणण्याचा प्रयत्न केला.

**मानवेंद्रनाथ रॉय यांच्या व्यक्तिमत्वाचे आकर्षण:**

यशवंतराव चव्हाण कॅम्पजेलमध्ये असतांना डॉ. शेट्टी व ह.रा. महाजनी यांच्याकडून त्यांना एम. एन. रॉय यांच्या व्यक्तिमत्वाबद्दलची माहिती झाली. रॉय यांनी देशत्याग करुन पत्करलेला वनवास, मेक्सिकोमध्ये जाऊन केलेला कम्युनिझमचा स्वीकार, रशियन राज्यक्रांती नंतरच्या बांधणीच्या काळात आंतरराष्ट्रीय कम्युनिझमच्या प्रसारानिमित्त उभारलेल्या संघटनेत लेनिन समवेत केलेले कार्य या संबंधीची माहिती डॉ. शेट्टी आणि ह.रा. महाजनी यांनी सांगितली होती. रॉयच्या नावाचा प्रथम परिचय यशवंतरावांना कॅम्पजेलमध्ये अशा प्रकारे झाला.

**विविध चळवळीतील सहभाग:**

यशवंतराव चव्हाण यांनी राष्ट्रवादी चळवळीने भारावून गेल्यामुळे त्यांनी आंदोनने, चळवळी यामध्ये भाग घेतला होता. त्यांचा आढावा खालीलप्रमाणे-

**कायदेभंगाची चळवळ:**

म. गांधीच्या नेतृत्वाखाली भारतात कायदेभंगाची चळवळ सुरु झाली. या चळवळीत संपूर्ण देशात मीठ व जंगल सत्याग्रह सुरु झालेले होते. सरकारने दडपशाही सुरु केल्यामुळे त्यांच्या निषेधार्थ ठिकठिकाणी सभा होऊ लागल्या. त्या सभेस यशवंतराव जात असत. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, काकासाहेब गाडगीळ यांची कराड येथे झालेली व्याख्याने यशवंतरावांनी ऐकली होती. या चळवळीचा त्यांच्या मनावर परिणाम झाला होता. त्यांनी प्रभातफेऱ्यात भाग घेतला. खेड्यात जाऊन भाषणे दिली. आपल्या भाषणातून म. गांधीचे नेतृत्व व स्वातंत्र्य चळवळीची माहिती ते देत असत. या चळवळीच्या निमित्ताने खेड्यातील लोकांशी त्यांचा परिचय होऊ लागला. कराड तालुक्यात मसुर, इंदोली आणि तांबवे ही चळवळीची केंद्रे होती. तांबवे या गावचे काशीनाथ पंत देशमुख यशवंतरावांचे मित्र होते. ते गांधी भक्त असून, अहिंसेचे पुरस्कर्ते होते. त्यांचे यशवंतरावांवर जीवापाड प्रेम होते. काशिनाथपंतांनी यशवंतरावांना त्यांच्या भागामध्ये नेऊन जनआंदोलनाच्या प्रक्रियेचे शिक्षण दिले.

**बिळाशी बंड:**

सातारा जिल्ह्यातील बिळाशी वारणेकाठचा प्रसिध्द भाग आहे. या भागातील चाळीस गावातील पाटील मंडळींनी बाबुराव चरणकर आणि गणपतराव पाटील यांच्या नेतृत्वाखाली सरकारी नौकरीचे राजीनामे दिले. त्यामुळे या भागातील ब्रिटीशांचा अंमल संपल्यासारखी परिस्थिती निर्माण झाली होती. पोलिसांना सुध्दा या भागात मोकळ्या स्थितीत फिरता येत नव्हते. सरकारने यास बिळाशी बंड असे नाव दिले होते; परंतु ते सशस्त्र बंड नव्हते तर तेथील जनतेने शांततेच्या मार्गाचा अवलंब करुन सरकारशी सहकार्य तोडले होते. सरकारी प्रचारातून बंड असे नाव पुढे करुन सरकारने तेथील जनतेवर अत्याचार करण्यास सुरुवात केली होती. पोलिसांनी कार्यकर्त्यांना अटक केली होती. त्यामुळे त्या भागातील जनतेला दिलासा देण्यासाठी कराडहून राघुआण्णा लिमये व यशवंतराव चव्हाण यांना पाठविण्यात आले होते. या दोघांनी बिळाशीला भेट दिली. तेथील कार्यकर्त्यांना धीर दिला. त्यांच्या मनात विश्वासाचे वातावरण निर्माण केले. सातारा जिल्ह्यातील स्वातंत्र्य चळवळीची माहिती त्यांना दिली. बिळाशी भागात जाऊन यशवंतरावांनी जे कार्य केले, ते त्यांच्या जीवनातील अविस्मरणीय अशी घटना यशवंतराव मानतात.

**मसूर परिषद:**

लोकमान्य टिळकांच्या काळापासून काँग्रेसच्या राजकीय परिषदा भरविण्याची प्रथा निर्माण झालेली होती. सातारा जिल्ह्यात अधून-मधून राजकीय परिषदा भरत असत. १९३१ मध्ये सातारा जिल्ह्यातील प्रमुख पुढाऱ्यांनी राजकीय परिषद भरविण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार कराड तालुक्यातील मसुर या ठिकाणी ही परिषद आयोजित करण्यात आली. या परिषदेचे अध्यक्ष माधवराव अणे हे होते. या

परिषदेत अनेक राजकीय विषयावर चर्चा झाली. परिषदेतील एका राजकीय ठरावाला माधवराव बागल यांनी एक उपसूचना मांडली. त्यात त्यांनी राजकीय मागण्यांबरोबर आर्थिक स्वरुपाच्या मागण्यांवर भर दिलेला होता. त्यात सावकाराने दामदुप्पटी पेक्षा कर्ज वसूल न करणे, नऊ टक्क्यांपेक्षा जास्त कर न आकारणे, शेती कसणाऱ्या कुळांना शेती कसण्याचा कायम हक्क असावा, अशा स्वरुपाच्या सूचना मांडल्या होत्या.

**१९४२ च्या चळवळीतील सहभाग:**

मुंबईतील गोवालिया टैंक मैदानावर ७ व ८ ऑगस्ट, १९४२ रोजी अखिल भारतीय काँग्रेसचे अधिवेशन भरले. या अधिवेशनात छोडो भारत ठराव संमत करण्यात आला. या अधिवेशनासाठी यशवंतराव व त्यांचे सहकारी मुंबईला गेले होते. हा ठराव संमत झाल्यानंतर निर्माण होणाऱ्या परिस्थितीवर चर्चा करण्यासाठी ८ ऑगस्ट, १९४२ रोजी मुंबईतील बद्रिकाश्रमात सातारा जिल्ह्यातील कार्यकर्ते एकत्र जमले हाते. त्यात यशवंतरावांचा समावेश होता. मुंबईत असलेल्या साताराच्या काँग्रेस कार्यकर्त्यांनी आणि सातारा जिल्ह्यातील काँग्रेस कार्यकर्त्यांनी उत्स्फुर्तपणे भूमिगत होऊन चळवळ पुढे सुरु ठेवण्याचा निर्णय एकाच वेळी घेण्यात आला.

**भूमिगत चळवळीच्या स्वरुपात बदल:**

१९४२ ची चळवळ सुरु झाली, तेव्हा यशवंतरावांसमोर दोन पर्याय होते. एक म्हणजे ब्रिटीश सत्ता खिळखिळी करण्यासाठी त्या सत्तेला आधारभूत असलेल्या गोष्टीचा विध्वंस करणे किंवा स्वातंत्र्य लढ्याचा संदेश जनतेपर्यंत नेऊन तिला लढ्यासाठी संघटित करणे. यशवंतरावांच्या दृष्टीने दुसरा पर्याय महत्वाचा व आवश्यक होता आणि तोच यशवंतरावांनी स्वीकारला. सातारा जिल्ह्यातील लढ्याचे दोन टप्पे पडतात. पहिला टप्पा जागृत जनतेने उठविलेल्या आवाजाचा आणि दुसरा टप्पा ह्याच जनतेने ब्रिटिश सरकारच्या दडपशाहीला दिलेल्या प्रत्युतरांचा. यशवंतरावांचा पहिल्या टप्प्याशी निकटचा संबंध होता.

**सारांश:**

यशवंतरावांनी लहानपणापासून राजकीय चळवळीत भाग घेतला. त्यानिमित्ताने खेड्यातील लोकांशी त्यांचा परिचय झाला. श्रमिक कार्यकर्त्यांशी ओळख झाली. माणसे ओळखण्याचे शिक्षण मिळाले, या विविध चळवळीत यशवंतरावांनी विचारपूर्वक व निष्ठेने भाग घेतला होता. त्यातून त्यांचे जीवन वैचारिक बनले आणि त्यातूनच त्यांच्या नेतृत्वाचे बीज रोवले गेले. या चळवळीतून त्यांनी विचाराबरोबर वर्तृत्वाची कला संपादन केली. चळवळीच्या काळात अनेक पक्ष, नेते, विचारसरणी यांचा अभ्यास करण्याची संधी त्यांना मिळाली त्यातून त्यांचे व्यक्तिमत्व सुसंस्कारित झाले. विविध परिषदांत सहभाग नोंदविला, त्यातून अनेक मित्र व कार्यकर्ते जोडले गेले. यातून संघटना कौशल्य आत्मसात केल्याचे दिसून येते. यशवंतरावांनी आपल्या कारकिर्दीतील पदावर आपल्या प्रशासकीय सामर्थ्याचा, चोख व्यवहाराचा उसा उमटविला. अष्टपैलू, दूरदर्शीत्व, शुद्ध चारित्र्य, राजकारण धुरंधर, प्रभावी वक्ता अशी कितीतरी विशेषणे त्यांच्या या काळात त्यांना बहाल करता येतील. भारताच्या इतर प्रदेशांनी महाराष्ट्राकडे अनेक बाबतीत गुरुत्वाच्या नात्याने पाहावे अशा योग्यतेचे महाराष्ट्राचे सुपूत्र यशवंतराव चव्हाण होते.

**संदर्भग्रंथ”**

१. Smith Henry Clay, 1974, Personality Development, New York, McGraw, Hill Book Company.
२. फडके ना. सी., इथे जाहला सुंदर संगम तीन अमोल गुणांचा : २००३, यशवंतराव : कर्तृत्व आणि नेतृत्व, संपादन : सारडा, शंकर, पुणे, दिलीपराज प्रकाशन, प्रा.लि.
३. फडके ना. सी., इथे जाहला सुंदर संगम तीन अमोल गुणांचा : २००३, यशवंतराव : कर्तृत्व आणि नेतृत्व, संपादन : सारडा, शंकर, पुणे, दिलीपराज प्रकाशन, प्रा.लि
४. कोलते वि. भी., सर्वस्पर्शी व्यक्तिमत्त्व : १९७०, यशवंतराव चव्हाण : जीवन दर्शन, पुणे, कर्मवीर प्रकाशन पुणे,
५. यशवंतरावाच्या मुलाखतीतून. चव्हाण यशवंतराव - कृष्णा काठ
६. भा.ल. भोळे - यशवंतराव चव्हाण राजकारण व साहित्य
७. चव्हाण यशवंतराव ऋणानुबंध व्हेल हेगन - 'आफ्टर नेहरू हूं'

८. भोळे भा.ल. - यशवंतराव चव्हाण - राजकारण आणि साहित्य

९. जोशी लक्ष्मणशास्त्री यशवंतराव 'राष्ट्रीय व्यक्तीमत्व', लेखातून, केसरी- २४ नोव्हेंबर, १९८५.

१०. यशवंतरावांची-रामभाऊ जोशी यांनी घेतलेल्या मुलाखतीतून.

११. चव्हाण यशवंतराव - तीस वर्षापूर्वी या लेखातून 'लोकराज्य'- १५ ऑगस्ट, १९७२.

१२. सूर्यवंशी ना. दि. (2023). यशवंतराव चव्हाण यांचे राजकीय कार्य. International Journal of Classified Research Techniques & Advances (IJCRTA) ISSN: 2583-1801, 3(2), 26-29. ijcrta.org